महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
दूरध्वनी क्र.२७५७१५१७/२७५७८००३, फॅक्स क्र.२७५७१५१६,
ई-मेल: rbkonkan@gmail.com / konkandcr@gmail.com

---

जा.क्र./ल. ले/कां.स/ 06 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई – 400 001 दिनांक:-12.7.23

प्रति,
जिल्हाधिकारी मुंबई/ मुंबई उपनगर/ पालघर/ठाणे/रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग.

**विषय**:- कांदळवन क्षेत्रावर टाकण्यात आलेले डेब्रिज हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत.

**संदर्भ**:- 1. कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.30.06.2023 रोजीच्या 22 व्या बैठकीतील निर्देश.
2. सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील जा.क्र.कक्ष-1/ल.ले/50A/सन 2023-24 दि.24.05.2023 (21 व्या बैठकीचे इतिवृत्त)

विषयांकीत प्रकरणी, जिल्हाधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.30.06.2023 रोजीच्या 22 व्या बैठकीतील दिलेल्या निर्देशानूसार, आपल्या कार्यक्षेत्रातील कांदळवन क्षेत्रात असलेल्या डेब्रिजबाबत संबंधित महानगरपालिका यांच्या समवेत समन्वय साधून सखोल तपासणी करावी. तसेच कांदळवनांत डेब्रिज टाकण्याबाबतच्या तक्रारी संबंधी नियोजित करण्यात येणाऱ्या स्थळ पाहणी वेळी संबंधित अधिकारी यांनी प्राधान्याने उपस्थित राहून कोणत्याही कांदळवन संवर्धनासंबंधी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. 87/2006 अन्वये दिलेल्या आदेशांचे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसेच यासंबंधी असलेल्या कोणत्याही कायद्याचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. कांदळवन क्षेत्रावर डेब्रिज असल्यास सदर डेब्रिज योग्य ठिकाणी हलविण्याबाबत जागा निश्चित करुन करावयाच्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तात्काळ सादर करावा.

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
अध्यक्ष
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग

प्रतिलिपी:- सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.